Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ५ ] गुरूवार ते बुधवार, मार्च ३-९, २०२२/फाल्गुन १२-१८, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. २०.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्ताव**

क्रमांक अमनपा-ससंनर-कलम ३७(१)-१२९३-२०२२.—

अकोला शहराच्या मुळ हद्दीची सुधारित विकास योजना शासनाची अधिसूचना, क्र. टिपीएस-२५०८-६८०-सीआर-१२९(ब)-२००२-युडी-३०, दिनांक २६-१०-२००४ अन्वये मंजूर केलेली असून दिनांक १५-१२-२००४ पासून अंमलात आली आहे.

अकोला शहराच्या उक्त मंजूर विकास योजनेमध्ये ३०.०० मीटर रुंदीचा कॅनाल (पाण्याखालील क्षेत्र) दर्शविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत कॅनाल अस्तित्वात नसून सदर कॅनाल मुंबई-कोलकत्ता रेल्वेलाईन पासून डाबकी रोड ते बाळापूर रोड व पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ ला जोडणारा मार्ग कॅनाल ऐवजी ३० मीटर रस्ता करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

उक्त फेरबदलाच्या प्रस्तावास मा. महासभेने ठराव क्र. ११, दिनांक १७-२-२०२२ अन्वये मंजूरी दिलेली आहे व सदर फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण करणे व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा. शासनास सादर करणेसाठी मा. महासभेने आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला यांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

**मा. महासभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार नियोजित फेरबदल दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | मंजूर विकास योजना अकोला (मूळ हद्द) | नियोजित फेदबदल प्रस्ताव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मुंबई-कोलकत्ता रेल्वेलाईन पासून डाबकी रोड ते बाळापूर रोड ते व पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ ला जोडणारा ३०.०० मी. रुंदीचा कॅनाल (पाण्याखालील क्षेत्र). | मुंबई-कोलकत्ता रेल्वेलाईन पासून डाबकी रोड ते बाळापूर रोड व पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ ला जोडणारा कॅनाल ऐवजी ३०.०० मी. रस्ता. |

उक्त नियोजित फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत अकोला, महानगरपालिकेच्या सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, अकोला यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ व निरिक्षणासाठी ठेवण्यात आलेली आहे. उक्त फेरबदला संदर्भात नागरिकांच्या हरकती/सूचना असतील तर त्यांनी ही जाहीर सूचना/नोटीस महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला यांचे नावे सादर करावयात, सदर हरकती सूचनांचा विचार करुन शासनास फेरबदलाबाबत अंतिम मंजुरीचा प्रस्ताव सादर केला जाईल. मुदतीनंतर येणा-या हरकती/सूचनांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कविता द्विवेदी**, (भा.प्र.से.),
आयुक्त,
अकोला महानगरपालिका, अकोला

अकोला :
दिनांक २५ फेब्रुवारी २०२२.

---

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. २१.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Proposal Modification under Section 37*(1)* of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.**

No. AMC-ADTP-Section 37(1)-1293-2022.—

Government Sanctioned Development Plan TPS-2508-680-CR 129(B)-2002UD-30 by decision dated 26-10-2004 which came in force of dated 15-12-2004 for Development in original city limit of Akola City.

In the said sanctioned Development Plan of Akola City the 30.00Meter wide Canal (area under water body) is shown. Now, Canal is not existance this canal from Mumbai-Kolkatta Railway Line to Delhi Road to Balapur Road then upto National High way No. 6 is proposed 30.00 Meter wide Road. Proposal was moved before the General Body U/s 37*(1)* of M.R.T.P. Act, 1966..

General Body Resolution No. 11, dated 17-2-2022 for completion of the Legislative action and process and obtaining final sanction from Government to the said proposal with the said Modification the Commissioner, Municipal Corporation, Akola is hereby authorized by the General Body AMC, Akola.

**Table/Chart Showing Resolution in the said General Body for proposed Modification**

| Sr. No. | Sanctioned Development Plan Akola (Original City Limit) | Proposed Modification |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Mumbai-Kolkatta Railway Line to Dabki Road to Balapur Road then upto National High Way No. 6, 30.00 M. wide Canal (area under water body). | Mumbai-Kolkatta Railway Line to Dabki Road to Balapur Road then upto National High Way No. 6, Canal to be deleted and shown 30.00 M. wide Road. |

Copy of map showing the proposed Modification is displayed in office of Assistant Director of Town Planning, Municipal Corporation, Akola for inspection and observation by the citizen. Objection/Suggestion in respect of the said Modificataion by the public/citizen, if any to be filled in writing in the name of Commissioner, Municipal Corporation, Akola within 30 days from the publication of this public notice in the *official Gazette* of Government of Maharashtra. After considering the Objection/Suggestion the proposed Modification would be put before the Government for final sanctioned. Please note that, Objection/Suggestion received after the time limit will not be considered.

KAVITA DWIVEDI,(I.A.S.)
Commissioner,
Akola Municipal Corporation, Akola.

Akola :
Dated the 25th February 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.